# प्रेस नोट

दिनांक :- १३/१२/२०२५

श्री.नरेश रमेशराव रणधीर वय ५३ वर्ष पोलीस निरीक्षक पोस्टे अवधूतवाडी, जिल्हा-यवतमाळ, मुळ. रा. अंमळनेर, जि. जळगांव,ह.मु.जाजु चौक, यवतमाळ यांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती, यांनी रंगेहाथ पकडलेबाबत...

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | यवतमाळ युनिट |
| पो.स्टे व गुन्हा नोंद कमांक व कलम | अप क्र.१६०२/२०२५ पोलीस स्टेशन अवधूतवाडी जिल्हा यवतमाळ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | श्री.नरेश रमेशराव रणधीर वय ५३ वर्ष पोलीस निरीक्षक पोस्टे अवधूतवाडी, जिल्हा-यवतमाळ, मुळ. रा. अंमळनेर, जि.जळगांव,ह.मु.जाजु चौक, यवतमाळ |
| मागितलेली लाचेची रक्कम | ३,००,००० /- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १,००,००० /- रुपये |
| थोडक्यात हकिकत | तक्रारदार यांनी तक्रार दिली की, त्यांचे एका मित्राला पैशाची गरज असल्याने त्यांनी मध्यस्थी करुन त्यांचे दुसरे मित्राकडुन १०,००,००० रु घेवुन ६ महिन्याकरिता त्यांना दिले परंतु ज्या मित्राला पैसे दिले त्याने ६ महिने पुर्ण होवुनही घेतलेले पैसे परत दिलेले नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी दि. १०/१२/२०२५ रोजी ज्या मित्राला पैसे दिले तो परत करत नसल्याबाबतची तक्रार पोस्टे अवधुतवाडी जि.यवतमाळ येथे दिली असता श्री. नरेश रणधीर, पो. नि. पोस्टे अवधुतवाडी यांनी तक्रारदार यांना त्यांचे पैसे परत मिळवुन देण्याच्या मोबदल्यात ५,००,००० रु लाचेची मागणी केल्याबाबतची लेखी तक्रार दिली. सदर तक्रारीचे अनुषंगाने दि.१२/१२/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडे ३,००,००० लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यांनतर आयोजित सापळा कारवाई दरम्यान आलोसे श्री.नरेश रणधीर, पो.नि. पोस्टे अवधुतवाडी यांनी तक्रारदार यांचेकडुन मागणी केलेल्या लाच रक्कम पैकी ॲडव्हान्स म्हणुन १,००,०००रु लाच रक्कम स्विकारले वरुन आलोसे श्री.नरेश रणधीर, पो.नि.पोस्टे अवधुतवाडी, यवतमाळ यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेवुन, तक्रारदार यांची लेखी तक्रार नोंदवुन गुन्हयाचे तपासकामी अटक करण्यात आली आहे. गुन्हयाची पडताळणी व सापळा यांची माहीती मा.वरिष्ठांना फोनद्वारे कळविलेली असुन त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे पुढील तपास करीत आहोत. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,यवतमाळ तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ येथे संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ, दगडी इमारत, टांगा चौक यवतमाळ
संकेत स्थळ :- dyspacbyavatmal@mahapolice.gov.in
टोल फ्री कमांक :- १०६४ दुरध्वनी कमांक :- ०७२३२- २४४००२/८९७५७९१०६४

श्री. अभय आष्टेकर, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. यवतमाळ मो.नं. ८२७५०८८७९७
श्री.अर्जुन घनवट,पोलीस निरीक्षक ,ला.प्र.वि.यवतमाळ.मो.नं.९६२३१०१७०६
श्री.मनोज ओरके ,पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.यवतमाळ.मो.नं.८८५५०८०००७

(अभय आष्टेकर)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ